## नियमीत दिवाणी दावा क्र. ७१/२०१४ मधील निशाणी ४० खालील आदेश

प्रतिवादी क्र. ३ ते ८ ने त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करून मागितलेला आहे.

०२. प्रतिवादी अर्जात कथन करतात की, त्यांना कायद्याची माहिती नसल्यामुळे तसेच त्यांच्या वैयक्तीक अडचणीमुळे वकीलांना भेटून मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द करून कैफियत सादर करण्याची विनंती केली.

०३. वादींनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ४१ अन्वये म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. वादींनी अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. वादी असे कथन करतात की, प्रतिवादी क्र. ४ व प्रतिवादी क्र. ८ हे दिनांक १/३/२०१४ रोजी हजर झालेले आहेत, परंतु त्यांनी मुदतीत कैफियत सादर न केल्यामुळे त्यांचेविरुध्द विना कैफियत असा आदेश करण्यात आला. प्रतिवादी क्र.७ यांना समन्सची बजावणी होवून देखील ते न्यायालयात उपस्थीत न झाल्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक २०/०७/२०१५ रोजी एकतर्फा हुकुम झालेला आहे. प्रतिवादींनी, प्रतिवादी क्र. ७ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन न मागताच एकत्रात विना कैफियतीचा आदेश रद्द करुन मागितलेला आहे. सबब, वादींनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. वादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ३ ते ८ व त्यांच्या विधीज्ञांचा वारंवार पुकारा करता ते न्यायालयात गैरहजर. सबब, अर्ज गुण-दोषावर आदेश करण्यासाठी ठेवण्यात आला.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले, प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द कायम मनाईचा हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.३ आणि प्रतिवादी क्र. ७ यांना दाव्याचे समन्सची बजावणी होवूनदेखील ते न्यायालयात हजर न राहिल्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक ०८/०७/२०१४ व दिनांक २०/०७/२०१५ रोजी एकतर्फा हुकुम करण्यात आला.

तसेच प्रतिवादी क्र. ४ ते प्रतिवादी क्र. ६ आणि प्रतिवादी क्र.८ यांनी दाव्याच्या समन्सची बजावणी होवूनदेखील मुदतीत कैफियत सादर न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द विना कैफियत आदेश करण्यात आला. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे विना कैफियत झालेला आदेश रद्द करुन मागितलेला आहे. परंतु, प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.३ व प्रतिवादी क्र.७ विरुध्द एकतर्फा दावा चालविण्याचा आदेश झालेला आहे. परंतु, प्रतिवादी क्र.३ व प्रतिवादी क्र.७ यांनी तो आदेश रद्द न करता विना कैफियत झालेला आदेश रद्द करुन मागितलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी क्र.७ यांनी प्रथम त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन मागणे आवश्यक होते. तरीदेखील न्यायालयाला दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ चा वापर करुन पक्षकारांनी न मागितलेली दाद न्यायाच्या दृष्टीने देता येईल. सबब, जरी प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी क्र.७ यांनी एकतर्फा आदेश रद्द करुन मागितला नसला तरीदेखील तो आदेश न्यायालयाला रद्द करता येवू शकतो.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८, नियम १ प्रमाणे प्रतिवादींना दाव्याचे समन्सची बजावणी झालेपासून ३० दिवसाच्या आत अथवा न्यायालयाच्या परवानगीने जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत सादर करता येते. परंतु, प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रतिवादींना सन-२०१४ व सन-२०१५ साली समन्सची बजावणी झालेली दिसत आहे. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०५/०२/२०१८ रोजी सादर केलेला आहे. प्रतिवादींना ३ ते ४ वर्षांचा विलंब झालेला आहे. मुदतीचा कायदा कलम ५ प्रमाणे विलंबासाठी संयुक्तीक कारण नमुद करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी त्यांना कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे व त्यांच्या वैयक्तीक अडचणीमुळे मुदतीत हजर राहता आले नाही व कैफियत सादर करता आलेली नसल्याचे कारण नमुद केले आहे. सदरचे कारण हे संयुक्तीक कारण नाही. परंतु, प्रकरणाची गुण-दाषावर निर्गती करण्यासाठी प्रतिवादींना त्यांचा बचाव मांडणेकामी संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींना त्यांची कैफियत सादर करुन देणे मला योग्य वाटते. प्रतिवादींनी विलंबाबाबत संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे त्यांना दंड करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१) अर्ज (निशाणी ४०) मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. ७ विरुध्द झालेला एकतर्फा आणि प्रतिवादी क्र. ४, ५, ६ व प्रतिवादी क्र.८ विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रक्कम रु. १,०००/- च्या खर्चासह रद्द करण्यात येतो.

३) खर्चाची रक्कम वादींना देणेत यावी.

४) खर्चाची रक्कम वादींना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. ३ ते प्रतिवादी क्र. ८ यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला)

सही/-
**( पी.एम.माने )**
७वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी.

दिनांकः ०८/०३/२०१८
इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil (LG) |
| Name of Court | P. M. Mane,<br>7th Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Ichalkaranji. |
| Date of Dictation | 08/03/2018 |
| Judgment signed by P.O. on | 09/03/2018 |
| Judgment uploaded on | 09/03/2018 |